# महाराष्ट्र शासन

**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.**

*शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.*

ई-मेल पत्ता :- jdhe.pnvl-mah@gov.in Webside :- http://jdhepanvel.org दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०

जा.क्र.विससं/उशि/कोविप/मशि/नविन महाविद्यालय/२०१८/ 1619 दिनांक :- ०४/०७/२०१८

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, लवेल विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे, कै. पद्मश्री श्री. म.तथा अण्णासाहेब बेहरे इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट,मु. पो. लवेल, ता. खेड, जि. रत्नागिरी - ४१५७०८ येथे शासन आदेश क्र. एनजीसी २०१८/(१००/१८)/मशि-४, दिनांक :- १५ जून, २०१८ (अ. क्र. १३) नुसार बी. एस्सी. (हॉस्पिटॅलिटी स्टडीज) (०-६०) या नवीन महाविद्यालयास सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून उपरोक्त शासन मंजूरी आदेशातील अटी व शर्तींना अनुसरून कायम विना अनुदानित तत्वावर सुरू करण्यास परवानगी देण्यांत आलेली आहे. शासन आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे संस्था/ महाविद्यालयाकडून रू. १००/- च्या भारतीय गैरन्यायिक मुद्रांक पेपरवर उपरोक्त अभ्यासक्रम चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही स्वरूपातील अनुदानाची मागणी केली जाणार नाही, असे हमीपत्र महाविद्यालयाकडून/ संस्थेकडून दिनांक - २६.०६.२०१८ अन्वये शासन निर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेले आहे.

"महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम - २०१६" अंतर्गत तरतुदीनुसार मर्यादित विद्यार्थी प्रवेश तसेच प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या बिगतवारीसह नियतकालिक आढावा, नॅक ॲक्रिडीएशन बाबत करावयाची कार्यवाही आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग आणि अर्हताधारक व अनुभवी शिक्षकेतर कर्मचारी वर्ग नियुक्त करणे तसेच कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या तक्रारी व न्यायालयीन प्रकरणे यांविषयीचे उत्तरदायित्व स्विकारणे, आवश्यक त्या भौतिक सोयी-सुविधांची निर्मिती करणे या अटींच्या अधिन राहून शासन मंजूरी आदेशातील मार्गदर्शक सूचना व प्रचलित नियमानुसार विद्यापीठाने या संस्थेच्या / महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नवीन महाविद्यालय/ विषय/ तुकडी/ विद्याशाखा/ अभ्यासक्रमासाठी पुढील संलग्निकरण्याची प्रक्रिया सुरू करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

RBhosle
4/7/18
विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

स्थळ :- पनवेल
दिनांक :- ०४/०७/२०१८.
प्रत :-

१. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई -३२ / एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई - २० यांना सूचित करण्यात येते की, विद्यापीठांनी त्यांच्या संलग्निकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे / विद्याशाखांचे विहित शैक्षणिक शुल्क, विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणाऱ्या बाबी व इमारत, वर्ग खोल्या, पुरेशी आसन व्यवस्था उ. बाबी पूर्ण करण्याच्या सूचना, तसेच बार कौंसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई / ए.आय.सी.टी.ई., नॅक यांचेकडील ना- हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना पुनश्चः उपरोक्त संस्थेच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

उपरोक्त मान्यता नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/ विषय/ तुकडया सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी ज्यांची स्थापना होऊन ५ वर्ष झाली आहेत त्यांनी एक वर्षात व ज्यांची ५ वर्षे झालेली नाहीत त्यांची ५ वर्षे पूर्ण होताच एक वर्षात नॅक ॲक्रिडिएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर विद्याशाखा मान्यता आपोआप रद्द होईल. तसेच शासन निर्णयानूसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्निकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.